Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal No. 47100

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Single Blind Review / Double Blind Review

Volume - XII, Issue - II
February - July - 2024
English Part - II / Marathi / Hindi

Impact Factor / Indexing
2023 - 7.508
www.sjifactor.com

Ajanta
Prakashan

Scanned with OKEN Scanner

# CONTENTS OF MARATHI



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १ | संस्कृत नाट्यसृष्टी<br>**प्रा. दिक्षा विजय मोरे** | १-४ |
| २ | चंदन शेती : समस्या आणि संभाव्यता<br>**मोहिते किरण शांताराम**<br>**डॉ. आरकेरी शांता** | ५-१० |
| ३ | जीवन आणि संगीत<br>**प्रा. डॉ. अस्मिता नानोटी** | ११-१४ |
| ४ | मानसिक स्वास्थ्य आणि भगवद्गीता<br>**प्रा. रचना सौरभशहा** | १५-१९ |
| ५ | भारतीय संविधान आणि मानवी अधिकार<br>**डॉ. सय्यद आर. आर.** | २०-२२ |
| ६ | विगामी संशोधन तंत्राचा विकाक, मांडणी व समस्या : प्रान्सिस बेकन<br>**सहा. प्रा. पुष्पा देवतळे** | २३-२८ |





Scanned with OKEN Scanner

VOLUME - XII, ISSUE - II - FEBRUARY - JULY - 2024
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 7.508 (www.sjifactor.com) 

# १. संस्कृत नाट्यसृष्टी

**प्रा. दिक्षा विजय मोरे**
साहाय्यक प्राध्यापक, संस्कृत विभाग, किसनवीर महाविद्यालय, वाई.

## प्रस्तावना

अभिव्यक्तीचे सशक्त माध्यम हे नाटकच असू शकते या मताची प्रचिती येते ती संस्कृत नाटकांमधूनच आजच्या युगात माणूस सजीव असून देखील तो निर्जीव असल्यासारखा वाटतो. कारण तर स्पष्टच तंत्रज्ञानाच्या विकासाच्या आकर्षणामुळे माणसाला एकमेकांशी संवाद साधायला सुद्धा फुरसत नाही. म्हणूनच तिथे नाटक हे एकमेव माध्यम जिवंतपणा आणताना दिसते. अनेक विविध भाषांमधील साहित्य हे लुप्त होताना दिसते. परंतु काही भाषांमधील साहित्य हे त्या श्रेष्ठ कवी, लेखक, नाटककारांमुळे आजही मनोरंजनाचे साधन बनून जाते.

संस्कृतातील नाटके म्हंटली की आपल्या डोळ्यांसमोर सर्वप्रथम येतो तो कालिदास - कालिदासाची उपमा चराचरात ओतप्रोत भरलेली आहे. या कालिदासानेच संस्कृत नाटकांना जीवंतपणा आणलेला दिसून येतो. संस्कृत नाटकांची वैविध्यता एखाद्या रसाळ फळासारखी जाणवून येते. संस्कृत नाटकांमधून जीवनाचा एक रंगबिरंगी पटच उभा राहतो. या नाटकांमधून निखळ कलात्मक आनंदच अनुभवास येतो, त्यामुळेच जीवनात अनुभवायला येणाऱ्या रसभावांशी मानवाचे एक नाते तयार होताना दिसून येते.

संस्कृत नाट्याच्या उत्पतीविषयी एक आख्यायिका प्रसिद्ध आहे. देवांनी ब्रह्मदेवाला सर्व लोकांना कळतील असा वेद निर्माण करावयास सांगितला त्यावर ब्रह्मदेवाने नाट्यवेद नावाचा पाचवा वेद निर्माण केला. ऋग्वेदातून पाठ्य, यजुर्वेदातून अभिनय, सामवेदातून ज्ञान, अथर्ववेदातून रस घेऊन ब्रह्मदेवाने हा परिपूर्ण असा पाचवा वेद म्हणजे नाट्यशास्त्राची निर्मिती केली आणि तिथून पुढे संस्कृत विषयातील नाटकांची सुरुवात झाली. संस्कृत नाटके ही रसप्रधान आहेत. ज्याप्रमाणे फळातील रसामुळे फळ चवदार लागते त्याची गोडी वाढते त्याचप्रमाणे संस्कृत नाटके रसांनी ओतप्रोत भरलेली आहेत.

रामायण आणि महाभारत या महान ग्रंथांना आधार मानून अधिकाधिक नाटके लिहिली गेली. संस्कृत नाटकांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची सुरुवात नांदीने होते तर शेवट भरतवाक्याने होतो. संस्कृत नाटकातील अंक ही कमीतकमी पाच व जास्तीत जास्त सात आहेत. संस्कृत नाटकातील उच्च दर्जाची पात्रे संस्कृत भाषेचा प्रयोग करतात, तर इतर पात्रे प्राकृत भाषेचा वापर करतात. संस्कृत नाटकांमधील विदूषक ही पात्र आपली आगळी वेगळी भूमिका बजावताना दिसतो.

कालिदास आणि नाटक आणि नाटक आणि कालिदास ही व्यक्तीच डोळ्यासमोर येऊन जाते ते त्याच्या नाटकातील काव्य सौंदर्यामुळेच. त्याच्या काव्य सौंदर्यामुळेच परिपूर्ण भरलेल्या उपमा या ऊपमांमुळेच कोणीही त्याची बरोबरी करणे दुर्लभच. याची प्रचिती येते ती 'अभिज्ञानशाकुंतकम्' या नाटकानेच. 'मालविकाग्निमित्रम्' या नाटकापासून कालिदासाची सुरुवात होते. त्याच्या नाविण्याचा टवटवीत पणा, रसरशीतपणा जाणवून येतो. फळ जसे आधी कच्चे असते आणि पुढे परिपक्व होत जाताना दिसते. त्याचप्रमाणे कालिदासाच्या नाटकाची सुरुवात होते. विक्रमोर्वशीय या नाटकामध्ये तर उत्कट प्रणयाचे चित्रण च केलेले दिसते.



Scanned with OKEN Scanner

अभिज्ञानशाकुंतकम्' ही तर संपूर्ण जगभर प्रसिद्धच आहे. या नाटकाच्या प्रत्येक पानामध्ये कालिदासाची उपमा ओतप्रोत भरलेली आहे. अलंकार आणि उपमा यांचा संगमच जाणवतो.

कालिदासानंतर दुसऱ्या नंबरवरती आहे तर तो आहे भास. भासाचे प्रतिमा नाटक तर चरित्रचित्रण आणि विस्तारी वाक्य यांमुळे सफल झालेले आहे. भासाच्या अभिषेक नाटकात तर शीर्षकाला शोभेल असेच राज्याभिषेकांशी निगडीत वर्णन केलेले दिसते. दूतवाक्यामध्ये कृष्णाच्या आयुधांचा मनुष्य रूपात प्रवेशच दिसतो . दूतघटोत्कच ही एकअंकी भावनाट्य आहे. संवाद असा झालेला दिसतो की वाचकाला श्वास रोखून धरायला लावतो. उदात्त, गंभीर आणि शोकयुक्त चित्रण करणारे एकांकि नाटक म्हणजेच ऊरुभङ्गम् ही शिरपेचामध्ये डौलाने शोभणारा तुराच वाटतो. भासाचे सर्वात प्रसिद्ध नाटक तर 'स्वप्नवासवदत्तम्' भासाचे ही नाटक तर टीकाकारांच्या अग्निपरीक्षेत ही तासुनसुलाखून उजळ झालेले दिसते. मृच्छकटिकम् ही प्रकरण या वर्गातले नाटक आहे. वास्तवाचा गंध असलेले ही नाटक आहे. लौकिक जीवनाचा आभास येथे निर्माण झालेला आहे. शुद्रकाने मनाला मोहून टाकणारा विनोद त्यातील बीभत्सेमुळे तर अंगाला शहारे येतात.

भवभूतीच्या उत्तररामचरितात प्रेम जीवनाचा अथांग संगरच वाहताना दिसतो. रामाच्या चरित्रापासून ते त्याच्या जीवनातील घडलेल्या बारीक सारिक सर्व गोष्टींचे वर्णन त्यामध्ये केलेले आहे. रामकथांच्या पौराणिक अनुभवांनया त्याने प्रेमाचे मानवी चित्रण बनविलेले दिसते. एखादा प्रसंगच नाट्यरूपात फुलवण्यात भट्टनारायण प्रवीण ठरलेला दिसतो. शृंगाराचा जो लवचिकपणा आहे तो आपल्याला वेणीसंहारातून दिसून येतो. विशाखदत्ताच्या मुद्राराक्षस या नाटकातून राजनीतिविषयक सल्ला मिळतो. एकापेक्षा एक वरचढ धुरंधर राजकारणी दोन पुरुषांची रस्सीखेचच रंगवली आहे. कपट कारस्थाने, लबाडी, डावपेच या सर्वांचे मिश्रण आपल्याला मुद्राराक्षस या नाटकामध्ये प्रत्ययास येते.

साहित्यामध्ये नाटीकेची जी रचना सांगितलेली आहे त्या सर्व मर्यादा लक्षणे या रत्नावली नाटीकेमध्ये यथासांग निर्देशिलेल्या आहेत. ह्या नाटीकेमध्ये जरी चार अंक असले तरी ही नाटिका अत्यंत लोकप्रिय आणि मनोरंजक आहे.

प्रियदर्शिका ही नाटिका जरी कनिष्ठ दर्जाची वाटत असली तरी वाचकांना ती मोहून टाकणारी आहे. या नाटीकेमधून एक प्रकारचा जिवंतपणाच प्रत्ययास येतो. ज्याप्रमाणे पाण्याची खोल पातळी एखादा पोहण्यात तरबेजच जाणू शकतो त्याचप्रमाणे सर्व साहित्याचे मर्मच जाणणारा एकटा मुरारीच आहे असे वाटावे त्याच्या 'अनर्धराघव' या नाटकामुळे.

त्याची व्याकरणावरील एकंदरीत पकड आणि अवघड शब्द योजून किचकट शब्दरचना यांमुळे त्याचे नाटक वैशिष्ट्यपूर्ण ठरते. मुरारीविषयी एक आदर्शाची भावनाच मनामध्ये निर्माण होते. संस्कृतातील काही नाटके ही रामायण आदी आर्धमहाकाव्यांवर देखील आधारलेली आहेत. रामायणातील राम त्याचा जन्म आणि त्याला झालेल्या राज्याभिषेकाचे अत्यंत मनमोहक असे वर्णन यामध्ये आढळते. त्याच्या राज्याभिषेक सोहळ्याविषयी जे चित्र डोळ्यासमोर उभे राहते.

सदाचार आणि नीतिमत्तेचे उत्तम उदाहरण म्हणजे कृष्णमिश्राचे प्रबोधचन्द्रोदय होय. प्रसंगाला अनुसरून पात्रे यामध्ये रंगविलेली आहेत.

**संस्कृत नाट्याचे प्रकार**

नाटक सप्रकरणं भाण: प्रहसनं डिम : |
व्यायोगसमवकारौ वीश्यडकेहामृगा इति || ( दशरूपक **1.8** )

**1. नाटक**

भरतमुनींनी आपल्यासमोर नाटक हा दशरूपकांमधील सर्वात प्रमुख व महत्वाचा प्रकार मांडलेला आहे. नाटकाचा नायक हा सर्वात श्रेष्ठ दर्जाचा असतो. तो राजा किंवा दिव्य पुरुष असतो.

**2. प्रकरण**

'प्रकरण' हे नाटकहून भिन्न असते. शूद्रकाचे तृच्छकटिक हे प्रकरण या प्रकारात मोडते.

**3. भाण**

भाण हे एकपात्री असते. गणिका, धूर्त , विट अशी पात्रे त्यात असतात. भाणाचा विषय 'धूर्तचरित्र' असतो. विट मात्र एकटाच सर्व पात्रांची भूमिका बजावते. 'चतुर्भाणी' हा चार भाणांचा संग्रहच उपलब्ध आहे.

**4. प्रहसन**

प्रहसन हे हास्यप्रधान असते. वेश्या, धूर्त, चेट इत्यादी पात्रे प्रहसनात असतात. 'भगवदज्ज्युकीय' यां प्रहसनात गणिका आणि तपस्वी यांच्या आत्म्यांच्या बदलामुळे एक विनोदी प्रसंग घडलेला दिसतो.

**5. डिम**

डिम हे चार अंकी नाटक असते. याचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण 'त्रिपुरदाह' होय. यामध्ये युद्ध, द्वंद्व, जादू, माया इत्यादी गोष्टी असतात. आणि देव, दानव, यक्ष यांसारखी पात्रे असतात.

**6. व्यायोग**

व्यायोग ही वीररस युक्त, कृतिप्रधान अशी एकांकिका आहे. व्यायोग हा द्वंद्वयुद्ध आणि आव्हान यांनी युक्त असतो.

**7. समवकार**

समवकारामध्ये कपट, भांडणे तसेच दुसरीकडे शृंगाराचे वर्णन असते. याचे सर्वात प्रसिद्ध उदाहरण 'अमृतमंथन' होय. यामध्ये देव व असुरांची स्पर्धा, संघर्ष, एकमेकांना फसविण्याचे प्रयत्न यामध्ये प्रामुख्याने वर्णिलेले आहेत.

**8. वीथी**

वीथीमध्ये एकच अंक असतो. यामध्ये प्रणय प्रसंगाचे वर्णन प्रामुख्याने असल्यामुळे शृंगार रस सर्वात अधिक प्रमाणात आढळतो.

**9. अड्क**

स्त्रियांचे विलाप प्रामुख्याने अड्डकामध्ये आढळतात. विशेषकरून यामध्ये करून रसाचे अधिक्य असते. भासाचे 'उरुभंग' ह्याचे प्रसिद्ध उदाहरण आहे.

**10. ईहामृग**

ईहामृगामध्ये दिव्य स्त्रीच्या प्राप्तीसाठी घडणारा संघर्ष वर्णिलेला असतो.

अशाप्रकारे संस्कृत नाटके य दहा प्रकारच्या वैशिष्ट्यांनी युक्त आहेत. प्रत्येक प्रकारामध्ये एक वेगळेपण आढळते. आणि त्यातून संस्कृत साहित्यामध्ये भर पडलेली दिसून येते. तसेच प्रत्येक प्रकारात वेगवेगळे रस आढळून येतात. म्हणून रसाला नाट्याचा प्राण मानलेला दिसून येतो.



Scanned with OKEN Scanner

ज्याची सुरवात नांदीने होताना दिसते आणि ज्याचा शेवट भरतवाक्याने होतो, जे निर्जीवाला सजीव बनवेल एवढी ताकद ज्याच्यामध्ये आहे, प्रेमाचा अथांग सागर ज्यामध्ये वाहतो, रसांचे रसायन ज्यामध्ये ओतप्रोत भरलेले आहे. कधी धीरगंभीरता तर कधी लालित्य तर कधी युद्धाची भयावहता, कधी सद्गुण आणि सदाचाराचे आकर्षण, कधी एकनिष्ठ प्रीती, कधी सूर्यासारखी तेजस्वी प्रखरता तर कधी चंद्रासारखी शीतलता कधी चिंचेच्या आंबटपणाचा स्वाद तर कधी आम्ररसाचा गोडवा या सर्वांची प्रचिती जिथे पहावयास मिळते अनुभवण्यास मिळते ते एकमेव " नाटक " होय.

**संस्कृत नाटकांचा विकास**

संस्कृत नाट्य साहित्य प्रमुख्याने वैदिक काळापासूनच सुरु होताना दिसते. वेदांनंतर रामायण आणि महाभारतासारख्या महान ग्रथां मध्ये देखील नाटकांचे संकेत मिळतात. महाभारताच्या विराट पर्वामध्ये रंगशालेचा उल्लेख आलेला आहे. रामायणातदेखील नट, नायक, रंग तसेच नर्तिका नर्तक यांचा उल्लेख मिळतो. कौटिल्याच्या अर्थशास्त्रामध्ये सुद्धा नर्तक, गायक, वादक कुशीलव इत्यादी नाटकांचा प्रयोग करून आपली उपजीविका चालवीत असत. "कंसवध" तसेच "बलीबन्ध" या दोन नाटकांचा उल्लेख पतंजलिच्या महाभारतामध्ये आधळतो. अशा प्रकारे वैदिक काळापासूनच नाटकांचा विकास होताना दिसून येतो.

नाटकांमधून आभास विश्व गोचर होताना दिसते. 'नाटक' हा असा साहित्याचा प्रकार आहे की त्याचा अनुभव लहान बालकाला जेवढा घेता येईल तेवढाच तो वृद्धानाही लाभेल. ईश्वरीय नमनापासून प्रारंभ होणारे हे स्थायी मन आचंबित करणारे उन्हाळ्याच्या दिवसात जशी वाऱ्याची छोटी झुळूक शरीराला स्पर्श करून सुखाची, शीतलतेची झलक अनुभवास येते. नाट्यप्रेमीला जेवढी नाटकविषयी ओढ वाटते. तेवढी रसिकालाही वाटावी एवढे सामर्थ्य संस्कृत नाटकामध्ये आहे. संस्कृत नाटक कारांनी नाटकांच्या रूपात एक ठेवणच आपल्याला दिलेली आहे.

**निष्कर्ष**

एकंदरीत संस्कृत नाटककारांचे जेवढे गोडवे गावेल जेवढी देखील स्तुतीसुमने अर्पावीत तेवढी देखील त्यांच्या अगाध साहित्यापुढे कमीच पडतील नाटकाला पाचवा वेद म्हणून जी उपाधी मिळाली ती संस्कृत नाटककारांनी अविरत तशीच ठेवलेली दिसून येते. बालांपासून वृद्धांपर्यन्त सर्वाना प्रभावित करतील सर्वांचे मनोरंजन होईल अशा शैलीची ही नाट्यरचना दिसते. शास्त्राच्या आणि औचित्याच्या सर्व साखळदंडाने बांधलेले असून ही जरादेखील रसिकांना आनंद देण्यास कमी न पडलेली ही संस्कृत नाट्यसृष्टी म्हणूनच सर्व साहित्य प्रकारामध्ये संस्कृत नाट्याने आपले स्थान अजरामर केलेले दिसून येते. धन्य ती संस्कृत भाषा आणि धन्य टी संस्कृत नाट्यसृष्टी.

**संदर्भसुची**


- http//mr.m.wikipedia.org
- http//hi.m.wikipedia.org
- भारतीय संस्कृति कोश – खंड ४
- अभिजात संस्कृत साहित्याचा इतिहास - डॉ. मंजूषा गोखले, डॉ. गौरी माहुलीकर, डॉ. उमा वैद्य




Scanned with OKEN Scanner